सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
## जाहिरात क्रमांक 3/2024

महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागांतर्गत पुणे / कोकण / नागपूर / नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती विभागातील अनुरेखक (गट-क) संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावयाची सुविधा महाराष्ट्र शासनाच्या www.urban.maharashtra.gov.in व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. 18.10.2024 रोजी सकाळी 11:00 वाजल्यापासून उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच जाहिरात रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाच्या https://ese.mah.nic.in या संकेतस्थळांवर देखील उपलब्ध होईल.

*** रिक्त पदांचा तपशील**

| अ. क्र. | पदाचे नाव | पदाचे नाव | वेतनश्रेणी | एकूण पदे |
|---|---|---|---|---|
| 1 | गट-क | अनुरेखक | वेतनस्तरः एस-07, रु.21700-69100<br>अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते | 126 |

अनुरेखक (गट-क) संवर्गातील भरावयाच्या पदांचा विभाग निहाय सविस्तर तपशील विभागाच्या संकेतस्थळावर परिशिष्ट-1 मध्ये प्रसिध्द केल्याप्रमाणे आहे.

**टिपः-**

1. सर्व प्रादेशिक विभागांकडून अनुकंपा, अतिरिक्त संवर्ग कक्ष यांचेकडून प्राप्त होणाऱ्या माहितीला अनुसरुन तसेच अन्य इतर कारणांस अनुसरून, उपरोक्त भरावयाच्या पदांचा संवर्ग, सामाजिक / समांतर आरक्षण तसेच, पदसंख्या व राखीव / बिनराखीव पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे.
2. समांतर आरक्षणाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गातील अन्य पात्र उमेदवारांची निवड करुन पद भरतीची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.
3. परिशिष्ट-1 मध्ये नमूद विभाग निहाय रिक्त पदांपैकी एकूण 05 पदे ही शासन नियमानुसार नगर रचना विभागासाठी सुनिश्चित केलेल्या दिव्यांग प्रवर्गानुसार आरक्षित असून सदर पदे सामाजिक आरक्षणाचा विचार न करता भरली जातील.

* सदर जाहिरात सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग अधिनियम दिनांक 26 फेब्रुवारी, 2024 व संबंधित शासन निर्णय दिनांक 27 फेब्रुवारी, 2024 संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील दाखल रिट याचिका क्र. 3468/2024 व इतर न्यायिक प्रकरणातील मा. न्यायालयाच्या अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहुन प्रसिध्द करण्यात येत आहे. या जाहिरातीच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या उमेदवारांच्या शिफारशी व नियुक्त्या उक्त उल्लेखित न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येतील.

*** वेळापत्रक**

| अ. क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन अर्ज सादर करणेचा कालावधी | दि. 18 ऑक्टोंबर, 2024 रोजी 11:00 वाजलेपासून<br>दि. 17 नोव्हेंबर, 2024 रोजी 23:59 वाजेपर्यंत |
| 2 | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक 18 नोव्हेंबर, 2024 रोजी 23.59 वाजेपर्यंत |
| 3 | प्रवेशपत्र ऑनलाईन प्रिंट काढून घेणे | याबाबत www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सूचना प्रसिध्द करण्यात येईल. |
| 4 | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | |

**टिप -**

1. अनुरेखक पदासाठी ऑनलाईन परीक्षा स्वतंत्रपणे स्वतंत्र वेळापत्रकानुसार घेण्यात येतील. याबाबतच्या सूचना वेळोवेळी विभागाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. अशा सूचनांचे वेळोवेळी अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.
2. उमेदवारांच्या संख्येस अनुसरून आवश्यकतेनुसार वेगवेगळ्या दिवशी वेगवेगळ्या सत्रांमध्ये परीक्षा घेण्यात येतील.
3. अनुरेखक या पदासाठीची परीक्षा 2 स्तरांवर घेण्यात येणार असून प्रथमतः बहुपर्यायी ऑनलाईन पद्धतीने घेतलेल्या परीक्षेमध्ये किमान 45% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविलेल्या पात्र उमेदवारांचीच व्यावसायिक चाचणी परीक्षा स्वतंत्रपणे, स्वतंत्र वेळापत्रकानुसार घेण्यात येईल.

*** सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता-**

| अ. क्र. | पद | शैक्षणिक व तांत्रिक अर्हता |
|---|---|---|
| 1 | अनुरेखक (गट-क) | **शैक्षणिक अर्हता** - उच्च माध्यमिक शालांत परीक्षेनंतर मान्यताप्राप्त शासकीय संस्थेतून दोन वर्षांचे आरेखक पाठ्यक्रम (स्थापत्य) प्रमाणपत्र धारण केलेले किंवा शासनाने वेळोवेळी घोषित केलेली इतर कोणतीही समतुल्य अर्हता.<br><br>**तांत्रिक अर्हता** - मान्यताप्राप्त संस्थेकडील स्वयं-संगणक सहाय्यित आराखडा (ऑटो-कॅड) (Auto-CAD) किंवा अवकाशीय नियोजन यामध्ये भौगोलिक माहिती प्रणाली (Geographical Information System in Spatial Planning) उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. |

**टिप -**

प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास उमेदवाराने संबंधित शैक्षणिक व तांत्रिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

*** वयोमर्यादा :-**

1) उक्त पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे वय अर्ज सादर करणेच्या अंतिम दिनांकास किमान वय 18 वर्षे पूर्ण असावे व 38 वर्षापेक्षा जास्त नसावे.
2) मागासवर्गीयांसाठी / खेळाडूंसाठी / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी / सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गासाठी / उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा 05 वर्षे शिथिलक्षम राहील. तसेच दिव्यांग, भूकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्त उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा 45 वर्षापर्यंत तसेच पदवीधर अंशकालीन उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा 55 वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. शासन निर्णय क्र. मासैक- 1010/प्र.क्र.279/10/16-अ, दि.20.08.2010 मधील तरतूदीनुसार माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत विहित वयोमर्यादेतील सूट ही त्यांचा सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक 3 वर्षे इतकी राहील.
3) मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, अंशकालीन कर्मचारी आणि माजी सैनिक यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची कोणतीही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील.

*** परीक्षा शुल्क :-**

| अराखीव (खुला) प्रवर्ग - 1000/- | राखीव प्रवर्ग 900/- |
|---|---|
| उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.<br>माजी सैनिकांसाठी परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही. | |

* प्रस्तुत जाहिरातीमध्ये पदभरती संदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पद्धत, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या इ. बाबतचा तपशिल www.urban.maharashtra.gov.in, www.dto.maharashtra.gov.in व https://ese.mah.nic.in या संकेतस्थळांवरील 'सर्वसाधारण सूचना" मध्ये लिंक प्रसिध्द करतेवळी उपलब्ध करुन देण्यात येईल.

* भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल, सूचना वगैरे www.urban.maharashtra.gov.in. www.dtp.maharashtra.gov.in व https://ese.mah.nic.in या संकेतस्थळांवर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. याबाबत उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावरुन माहिती उपलब्ध करुन घेण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

* स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.

दिनांक : 09.10.2024
ठिकाण : पुणे.

**सही/-**
**(रा. म. पवार)**
**अध्यक्ष, राज्यस्तरीय निवड समिती, पुणे**
**तथा**
**सहसंचालक, नगर रचना,**
**पुणे विभाग, पुणे.**

डीजीआयपीआर/२०२४-२५/४३४३